९) सर्व नळ कनेक्शन ची कामे उत्तम प्रकारच्या पी.व्ही.सी. पाईप मध्ये करुन देण्यांत येईल.

१०) निवासी गाळयाची रंगरंगोटी उत्तम प्रकारच्या अॅक्रेलिक पेंट मध्ये लांबी पुट्टी भरुन करुन देण्यांत येईल.

११) ह्या निवासी गाळयाचा प्रमुख दरवाजा हा सुबक व सुंदर अशा लॅमिनेटेड फ्लश डोअर स्वरुपाचा राहील. इतर दरवाजे लॅमिनेटेड फ्लश डोअर स्वरुपाचे राहतील. प्रमुख दरवाज्याची चौकट टिक वुड मधील राहील व व इतर दरवाज्यांची चौकट ग्रेनाईट फ्रेम ची आहे. निवासी गाळयाच्या खिडक्या या अल्युमिनियम सेक्शन या मध्ये मॉस्कीटो नेट सह तयार करुन देण्यांत येतील. व त्यांना लोखंडी ग्रिल लावून देण्यांत येईल.

१२) संडास व बाथरुम मध्ये ७ फुटापर्यंत टाईल्स् लावून देण्यांत येतील.

१३) या संकुलामध्ये पॉवर बॅक अप सह लिफ्ट लावून देण्यांत येईल, त्याचे इले. बिल व मेंटनेंस् सर्व निवासी धारकांनी करावयाचे आहे.

१४) संकुलामध्ये प्रशस्त पार्कींग सुविधा उपलब्ध करुन देण्यांत येईल. तसेच संपुर्ण संकुलाला रेन वॉटर हार्वेस्टींग करण्यांत येईल.

१५) निवासी फ्लॅट हा फक्त तुम्हास निवासी कामाकरीताच वापरता येईल. त्याचा गोदाम किंवा दुकान म्हणून वापर करता येणार नाही.

१६) कॉम्प्लेक्स मध्ये सामान्य वापरासाठी सोडलेल्या मोकळया जागेवर तुमचा मालकी हक्क राहणार नाही. त्यावर केवळ वापरण्याचा हक्क व अधिकार राहील. सदर मोकळ्या जागेवर सर्व गाळेधारकांचा सामाईक अधिकार राहील.

१७) कॉम्प्लेक्समधील गच्चीवर सर्व गाळेधारकांचा सामाईकात फक्त वापरण्याचा अधिकार राहील.

१८) कॉम्प्लेक्स मधील इतर दुकान मालक आणि रहिवासीधारकांना त्रास होईल असा वापर तुम्हास करता येणार नाही. सदर निवासी गाळयाचा वापर फक्त रहिवासाकरीताच करावा लागेल, त्यामध्ये अवैध व्यवसाय करता येणार नाही.

१९) निवासी फ्लॅट चा पाणी पुरवठा हा बोअर वेल मधून ओव्हर हेड टॅक ला जाईल व ओव्हर हेड टॅक मधून निवासी फ्लॅटधारकांना पाणी पुरवठा करण्यांत येईल. बोअर वेल वर एक मशिन बसविण्यांत आली आहे त्या मशिनचा मेंटेनंस् चा खर्च, पार्कींग मधील लाईटचा खर्च, बोअर वेल वरील मशिनचे इले. बिल व अपार्टमेंट पुर्ण मेंटनेंनस् चा खर्च सर्व निवासी गाळेधारकांनी सामाईकात करावयचा आहे.

१९) वरील निवासी फ्लॅट चा बांधकामाच्या नकाशाची प्रत तुम्ही पाहिली आहे व त्या नकाशात दर्शविल्याप्रमाणे निवासी गाळयाचे बांधकाम करण्यांत येईल.